**परिपत्रक:-** **ई-निविदा प्रसिध्दी कालावधीबाबत.**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१**

---

**जा.क्रं.एमएच/मुअ-१/काअ-१/प्रा./** ET-49 **/२०२१.**
**दिनांक:** 28/01/2021

ICT Cell,
M. H. & A. D. Authority
Inward No.: ९५५
Date: २०/०१/२०२१.

**संदर्भ :** १. सार्वजनिक बांधकाम विभागाचा शासन निर्णय दि. २७/०९/२०१८.
२. मा. उपाध्यक्ष/प्रा यांचे परिपत्रक एमएच/मुअ-१/काअ-१/प्रा./ET-३६६/२०, दिनांक १४/१०/२०२०.
३. सार्वजनिक बांधकाम विभागाचा शासन निर्णय दि. १९/०१/२०२१.
४. मा. उपाध्यक्ष/प्रा. यांची क्र. ET-०२, दि. २०/१/२०२१ रोजी दिलेली मान्यता.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दि. २७/०९/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये ई-निविदा प्रसिध्दी कालावधी बाबतच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. व त्याप्रमाणे म्हाडाच्या कामांकरीता ई-निविदा प्रसिध्दी कालावधी ठरविण्यात आला आहे.केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यात कोरोना साथीच्या प्रार्दुभावामुळे राज्यातील शासनाची कामे करणाऱ्या कंत्राटदारांना चालू कंत्राटाबाबत सोसाव्या लागत असलेल्या अडचणीसंदर्भात उपाययोजना व सहाय्य करणेकरीता वित्त विभाग महाराष्ट्र शासनाने दि. २९/०७/२०२० रोजी शासन निर्णय निर्गमित केला होता. त्यातील आवश्यक त्या तरतुदी म्हाडाकरीता लागू करण्यासंदर्भात दि. १४/१०/२०२० रोजी परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. त्यात ई-निविदा प्रसिध्दी कालावधीबाबत निर्देश देण्यात आले नाहीत. संदर्भिय शासन निर्णय क्र. ३ अन्वये सार्वजनिक बांधकाम विभागाने ई-निविदा प्रसिध्दी कालावधीबाबत निर्देश निर्गमित केले आहेत. कोविड १९ च्या संसर्गामुळे सन २०२०-२०२१ च्या अर्थसंकल्पातील म्हाडाची अनेक कामे प्रलंबित आहेत. त्यामुळे दि. १९/०१/२०२१ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे दि. ३१/०३/२०२१ पर्यंत ई-निविदा प्रसिध्दी कालावधी खालीलप्रमाणे राहील.

| अ. क्र. | निविदा किंमत | कालावधी |
|---|---|---|
| १. | रु. ३.०० लक्ष ते १.५ कोटी | ८ दिवस |
| २. | रु. १.५ कोटी ते १०० कोटी | १५ दिवस |
| ३. | रु. १०० कोटीपेक्षा जास्त | ३० दिवस |

सदर मार्गदर्शक सूचना दि. ३१ मार्च २०२१ पर्यंत अंमलात राहतील. सदर परिपत्रकातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता सर्व संबंधितांनी घ्यावी. सदर परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून तात्काळ अंमलात येईल.

२८।१।२१

मा.उपाध्यक्ष/प्रा यांच्या मान्यतेने

**मुख्य अभियंता-१**
**प्राधिकरण**

**प्रति:-**

- मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्राधिकरण.
- मुख्य अभियंता-२,३/प्राधिकरण.
- वित्त नियंत्रण/प्राधिकरण.
- सचिव/प्राधिकरण.
- मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांचे स्वियसहाय्यक.
- मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
- मुख्य अधिकारी, मुंबई इमारत व पुनर्रचना मंडळ.
- मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ/पुणे/औरंगाबाद/नाशिक/नागपूर/कोंकण/अमरावती मंडळ.
- मुख्य जनसंपर्क अधिकारी/प्राधिकरण.

**माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव :**

- उपमुख्य अभियंता - दक्षता व गुण नियंत्रण कक्ष / प्रा., पी.एम.ए.वाय कक्ष/प्रा., पी.पी.डी./मुं.मं., पश्चिम/मुं.मं., पुर्व/मुं.मं., मुं.झो.सु. मंडळ, कोंकण मंडळ, पुणे मंडळ, नाशिक मंडळ, औरंगाबाद मंडळ, अमरावती मंडळ, नागपूर मंडळ यांना आपल्या अधिनस्त अधिकारी/ कर्मचारी यांना परिपत्रकाची प्रत अग्रेषित करण्यासाठी
- मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी/प्राधिकरण.
- कार्यकारी अभियंता-१/२/३/प्राधिकरण.
- मुख्य लेखापरिक्षक / म्हाडा.
- मुख्य लेखाधिकारी - मुंबई मंडळ/मुं.ई.दु. व पु. मंडळ / मुं.झो.सु. मंडळ / कोंकण मंडळ / पुणे मंडळ / नाशिक मंडळ / औरंगाबाद मंडळ / अमरावती मंडळ / नागपूर मंडळ.